सार्वमत
भविष्यवेध
दर गुरुवारी
ज्योतिष, अध्यात्म, वास्तू, रत्न, योगपत्रिका

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
सार्वमत ५० सुवर्णमहोत्सव १९७६-२०२६
अहिल्यानगर | अंक १५३ | वर्ष ५० वे | मंगळवार, २४ जून २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ६

आता आला आहे सिमेंट पत्र्यांना पर्याय
UPVC टाईड प्रोफाईल शिट (कौलारु पत्रे)
● थ्री लेअर प्रॉडक्ट – युव्ही प्रतिबंधक एएसए लेअर
● उष्णता रोधक हायब्रीड लेअर
● झीज रोधक युपीव्ही लेअर ● १००% व्हर्जिन मटेरीयल पासून बनविलेले.
दिसायला आकर्षक, टिकायला उत्तम, गंजणे, सडणे काही भीती नाही. वजनाला हलके असल्याने स्ट्रक्चर बनवतांना सिमेंट पत्र्यांपेक्षा खर्च कमी, शेडसाठी, कांदाचाळीसाठी उपयुक्त. वापरण्यास सोपे.
Like & Follow
Harish Agency
हरीष एजन्सीज्
राहुरी खुर्द, राहुरी, जि. अहिल्यानगर.
Contact - 7410717241 / 9370319458

झेडपी आणि महापालिका निवडणूक स्वतंत्रपणे होणार

राज्य निवडणूक आयोगाकडून पुढील महिन्यात वेळापत्रकाची घोषणा

मुंबई/अहिल्यानगर (प्रतिनिधी) – राज्यात मागील काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. तीन वर्षांपासून महापालिका आणि जिल्हा परिषदांचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. दरम्यान, या वर्षातच महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. याबाबत सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. राज्यात ऑक्टोंबरपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका वेगवेगळ्या होणार आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडून लवकरच वेळापत्रक येऊ शकते. **(पान ६ वर)**

झेडपी गट-गण प्रभाग रचनेची नगरला होणार तपासणी

शुक्रवारपासून तीन दिवसांचे वेळापत्रक: जिल्हा प्रशासन घेणार दक्षता

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – लवकर होवू घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट आणि गणाच्या निवडणुकीसाठी ग्रामविकास विभागाच्या आदेशानूसार प्रत्येक तालुक्यात प्रारूप प्रभाग रचना तयार करण्याचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. तयार करण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या गट आणि गणांची शुक्रवारपासून नगरला तपासणी करण्यात येणार आहे. २७, २८ आणि ३० जून जिल्हाधिकारी कार्यालयात तालुकानिहाय या प्रारूप प्रभागाची रचना तपासून त्यानंतर त्यांची घोषणा करण्यात येणार आहे. यामुळे एका प्रकारे गट आणि गणाची प्रभाग रचना करतांना जिल्हा प्रशासन दक्षता घेतांना दिसत आहे.

दरम्यान, साधारण दिवाळीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूका **(पान ६ वर)**

मनपा, नगर पालिका प्रभाग रचनेसाठी सुधारित कार्यक्रम

सप्टेंबरमध्ये नगर पालिका तर ऑक्टोबरमध्ये मनपासाठी अंतिम प्रभाग रचना

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – नगरविकास विभागाने अहिल्यानगर महापालिका व जिल्ह्यातील रिक्त असलेल्या ११ नगर पालिका व एका नगरपंचायतीच्या प्रभागरचनेचा सुधारीत कार्यक्रम सोमवारी जाहीर केला आहे. त्यानुसार निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर ३ सप्टेंबरला महानगरपालिकेची, तर १८ ऑगस्टला नगरपालिकांची प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यावर हरकती व सुनावणी होऊन ९ ते १३ ऑक्टोबर दरम्यान महानगर पालिकेची, तर २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान नगरपालिकांची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येणार आहे.

शासनाने १२ जून रोजी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार अहिल्यानगर महापालिका व जिल्ह्यातील रिक्त **(पान ६ वर)**

प्रभाग रचनेचा प्रस्ताव आयोगाला सादर होणार

निवडणूक आयोग अंतिम मान्यता देणार

मुंबई (प्रतिनिधी)– मुंबई, ठाणे, नाशिक महापालिकेसह राज्यभरातील अन्य महापालिका, नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य सरकारच्या नगरविकास विभागामार्फत राज्य निवडणूक आयोगाला सादर केले जाणार आहेत. नगरविकास विभागाने सोमवारी मुंबई महापालिका, अ वर्ग महापालिका, ब, क आणि ड वर्ग महापालिका तसेच नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचेनेचे विविध टप्पे आणि त्यासाठी जबाबदार असलेले संबंधित अधिकारी याबाबत शुद्धिपत्रक जारी केले.

नगरविकास विभागाने १० जून रोजी मुंबईसह २९ महापालिका तसेच नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभागरचनेचे प्रारूप तयार करण्याचे आदेश जारी केले होते. त्यानुसार मुंबईसह अ, ब, क आणि ड महापालिका क्षेत्रातील प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी संबंधित महापालिका आयुक्तांवर सोपविण्यात आली **(पान ६ वर)**

महत्त्वाचे

पांडूरंग चरणी सोन्याचा तुळशीहार

पंढरपूर – श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी माधवानंद महाराज गुरू वामनानंद स्वामी चिन्मयमूर्ती संस्थान, यवतमाळ येथील भाविकांनी सुमारे १७ लाख ६८ हजार किमंतीचा सोन्याचा तुळशीहार अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल मंदिर समितीच्या वतीने देणगीदार भाविकाचा मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला. सदर सोन्यांचा तुळशीहार २३२.९९० ग्रॅम वजनाचा असून, त्याची अंदाजे किंमत १७ लाख ६८ हजार रुपये आहे.

थरूर यांच्याकडून पंतप्रधानांवर स्तुतीसुमने

नवी दिल्ली– शशी थरूर यांच्याकडून पंतप्रधानांची पुन्हा स्तुती काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कौतुक केले आहे. ऑपरेशन सिंदूर वर लिहिलेल्या एका स्तंभात त्यांनी पंतप्रधान मोदींना भारतासाठी एक प्रमुख संपत्ती म्हणून वर्णन केले आहे. ते म्हणाले, पंतप्रधान मोदींची ऊर्जा, सक्रियता आणि इच्छाशक्तीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला बळकटी मिळाली आहे. यापूर्वीही त्यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक केले होते, त्यानंतर ते विरोधकांच्या निशाण्यावर आले आहेत.

भंडारदरा पाणलोटात पावसाचा जोर टिकून



भंडारदरा (वार्ताहर) – भंडारदरा धरण पाणलोटक्षेत्रात पावसाचा जोर टिकून असल्याने ११०३९ दलघफू क्षमता असलेल्या धरणात १६४ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. सोमवारी रात्री धरणाचा पाणीसाठा ४७७६ दशलक्ष घनफुटावर (४३.२६) पोहोचला. तर निळवंडेत ११२ दलघफू नवीन पाण्याची आवक होवून पाणीसाठा ३२६० दशलक्ष घनफुटावर (३९.१४) गेला आहे.

यावर्षी जून महिन्यात भंडारदरा धरण पाणलोटात मान्सून चांगलाच सक्रीय असल्याने पाणीसाठ्यात दिवसागणिक **(पान ६ वर)**

मुळा धरणातील आवक घटली

राहुरी (प्रतिनिधी)– मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर ओसरला असून धरणात पाण्याची आवक कमी झाली आहे. काल सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास २,२४७ क्यूसेकची आवक सुरू होती. धरणात सध्याचा पाणीसाठा १०,८०२ दलघफू झाला आहे. काल धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. **(पान ६ वर)**

गंगापूरच्या पाणलोटात मुसळधार पाऊस, विसर्गात वाढ

राहाता (तालुका प्रतिनिधी) – सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर काल दिवसभर पावसाची अधूनमधून जोरदार रिपरिप सुरू होती. गंगापूरच्या पाणलोटातील अंबोली येथे सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत १२ तासात १०६ मिमी पावसाची नोंद झाली. नवीन पाण्याची आवक झाल्याने विसर्ग ६,१६० क्यूसेकवर नेण्यात आला आहे. दारणा धरणाच्या पाणलोटातही पावसाने दमदार हजेरी लावली. गोदा-वरीचा विसर्ग ९,४६५ क्यूसेकवरून रात्री ९ वाजता १५,७७५ क्यूसेक करण्यात आला आहे.

परवाच्या काहीशा विश्रांतीनंतर काल दिवसभर गंगापूर धरणाच्या पाणलोटात जोरदार पाऊस **(पान ६ वर)**

सरकारी वाळूच्या लिलावास ठेकेदारांचा ठेंगा

१२ वाळू साठ्यांबाबत आता पावसाळ्यानंतर निर्णय होण्याची

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– राज्य सरकारने सुधारित वाळूधोरण जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने नगर जिल्ह्यातील १२ वाळू साठ्यांचे (रेती डेपोचे) ऑनलाइन पद्धतीने लिलाव करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले. मात्र, या लिलावाकडे वाळू ठेकेदारांनी पाठ केल्याने तिनदा ताराखा जाहीर केल्यानंतर देखील सरकारी १२ वाळू साठ्यांसाठी ठेकेदार मिळू शकला नाही. यामुळे हतबल झालेल्या जिल्हा गौणखनिज विभागाने आता पावसाळा संपल्यानंतर निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या धडसोड वृत्तीमुळे गेल्या वर्षभरापासून नगर जिल्ह्यात वाळू डेपाचे लिलाव होऊ शकले नव्हते. त्यातच राज्यात महायुती सरकार अस्तित्वात आल्यानंतर नव्याने महसूल मंत्री पदाची सूत्रे हाती घेतलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारित वाळू धोरण जाहीर केले. राज्य पातळीवरून वाळू धोरण निश्चित झाल्यानंतर जिल्ह्यात पहिल्यांदा **(पान ६ वर)**

येथे रखडले लिलाव

- कर्जत प्रांत कार्यालयातंर्गत कर्जत तालुक्यातील नागलवाडी, श्रीगोंदा-पारनेर प्रांत कार्यालयातंर्गत पारनेर तालुक्यातील तास (दोन ठिकाणी), पळशी, नागापूरवाडी, मांडवे खु., पळशी देसवंडे गावाच्या हद्दीत क्रमांक १ ते ४ या ठिकाणी तर श्रीरामपूर प्रांताधिकारी यांच्या अंतर्गत राहुरी तालुक्यातील जातप क्रमांक २ आणि देसवंडी अशा १२ ठिकाणी सरकारी वाळू साठ्याच्या लिलावास ठेकेदारांनी ठेंगा दाखवला आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ९ नवीन रस्ते

नगर जिल्ह्यातील रस्त्यांचा समावेश

नागपूर – नाशिक-त्र्यंबकेश्वर या ठिकाणी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात नगर जिल्ह्यातील शिर्डी, कोल्हार, शिंगणापूर या रस्त्यांचा समावेश आहे.

२०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. कुंभमेळ्यात देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक येणार असल्याने, वाहतूक व्यवस्थेसह संपूर्ण पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासाठी नागपूरमध्ये महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते. या बैठकीत संभाजीनगर ते नाशिक, नागपूर ते नाशिक तसेच नाशिक आणि त्र्यंबकेश्वरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांच्या **(पान ६ वर)**

वीजेच्या तारांना चिटकून बाप लेकाचा मृत्यू

जामखेड तालुक्यातील घटना

जामखेड (प्रतिनिधी) – जामखेड तालुक्यातील शिकारे वस्ती येथील बाळगव्हाण ग्रामपंचायतचे सदस्य काकासाहेब दौलत शिकारे (वय ४२) व त्यांचा मुलगा गणेश काकासाहेब शिकारे (वय १५) शेतामध्ये खते टाकण्यासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी आधीच तुटलेल्या तारांमधील वीजेचा करंट बसून या दोघांचा मृत्यू झाला.

ही घटना सोमवार (दि. २३) रोजी संध्याकाळी घडली असावी असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

संध्याकाळी हे बापलेक घरी परतले नाहीत, म्हणून कुटुंबातील काही सदस्य व काही ग्रामस्थांनी शोधा शोध केली असता त्यांचा शेतामध्ये मृतदेह विजेच्या तुटलेल्या तारे जवळ दिसून आला. १५ ते २० दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यात शिकारे **(पान ६ वर)**

दहावीसाठी १४ तर बारावीसाठी ११ केंद्रांवर आजपासून पुनर्परीक्षा

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – आजपासून मंगळवार (दि.२४) पासून दहावी-बारावीची पुनर्परीक्षा सुरू होत आहेत. जिल्ह्यात बारावीसाठी ११ तर दहावीसाठी १४ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेले आहेत. या परीक्षेसाठी दहावी व बारावीचे मिळवून ७ हजार ९३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी झालेले असून परीक्षा सुरळी व्हाव्यात या जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

तयारी पूर्ण : आठ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

जिल्ह्यात आजपासून दहावी-बारावीसाठी पुनर्परीक्षेला सुरूवात होत आहे. या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व्हाव्यात, यासाठी मागील आठवड्यात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची बैठक पारपडली. जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेसाठी ११ केंद्र असून ५ हजार ३४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली **(पान ६ वर)**